महाराष्ट्र माहितीचा अधिकारी अध्यादेश २००५

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

कार्यालयीन आदेश क्र. २८४/संकीर्ण ४६०५/का ८(१)/ममाअ/०५/जाक्र-12736
दिनांक 99 ऑक्टोबर २००५
वाचा : केंद्रिय माहिती अधिकार, अधिनियम २००५

आ दे श

संदर्भाधिन अधिनियमान्वये माहितीच्या अधिकाराबाबत केंद्रिय कायदा अस्तित्वात येत असल्यामुळे शासनाने यापूर्वी दिलेल्या निर्देशान्वये " शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय माहिती अधिकारी "यांचे पदनिर्देशन अधिक्रमीत करण्यात येत असून, केंद्रिय माहितीचा कायदा २००५ कडील कलम ५ (१) (२) नवीन तरतूदीनुसार सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रत्येक कार्यालयात पदनिर्देशित करणे आहे.

शासनाने सुचित केल्याप्रमाणे मोटार वाहन विभागातील परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई, प्रादेशिक परिवहन कार्यालय, व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात खालील अधिकारी यांचे पदनामासमोर दर्शविल्याप्रमाणे सहाय्यक माहिती अधिकारी,माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून पुढील आदेश होईपर्यंत एतद्वारे नियुक्ती देण्यात येत आहे.

१) परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक माहिती अधिकारी | : | कार्यरत जनसंपर्क अधिकारी |
| माहिती अधिकारी | : | परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व उप परिवहन आयुक्त दर्जाचे अधिकारी (परिवहन उप आयुक्त-प्रशासन, अंमल-(१) (२), संगणक, प्रशिक्षण, निरिक्षण, उपआयुक्त लेखा), सहाय्यक पोलीसआयुक्त(दक्षता) |
| अपिलीय अधिकारी | : | प्रकरणपरत्वे अपिलीय अधिका-यांची नेमणूक परिवहन आयुक्तांमार्फत केली जाईल |

२) प्रादेशिक परिवहन कार्यालये

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक माहिती अधिकारी | : | कार्यरत वरिष्ठतम सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी |
| माहिती अधिकारी | : | कार्यरत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी(सर्व) |
| अपिलीय अधिकारी | : | कार्यरत प्रादेशिक परिवहन अधिकारी |

३/८

३) <u>उप प्रादेशिक परिवहन कार्यालये</u>

| | |
|---|---|
| सहाय्यक माहिती अधिकारी | मुख्य लिपीक/कार्यालयीन अधिक्षक किंवा लिपिकवर्गीयांतील वरिष्ठ कर्मचारी |
| माहिती अधिकारी : | कार्यरत सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व) |
| अपिलीय अधिकारी : | कार्यरत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी |

सर्व संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील वर दर्शविलेल्या अधिका-यांची नियुक्ती करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयातील सहाय्यक माहिती अधिकारी (जनसंपर्क अधिकारी),परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावा.

सदर आदेश त्वरीत अंमलात येत आहेत.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
१) सर्व नियंत्रक अधिकारी,सर्व कार्यासन अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
२) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांचे कार्यालये

प्रत,
प्रति, अवर सचिव, गृह विभाग(परिवहन-४), कक्ष अधिकारी, गृह विभाग (आस्था-१), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

C:\PRLETINORDER\47

★

**<u>अति तात्काळ/कालमर्यादा</u>**

क्र.पआका/जसंअ/केंमाअ ०५-०६/जा.क्र.४४३६
**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३ रा व४ था मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१
दिनांक - १ एप्रिल २००६

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी

**विषय-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २५(२) व(३) अनुसार कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत

**संदर्भ-** १.सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक एचडीओ ०२०६/४४१/प्र.क्र.५२/आस्था-१ दि.९.३.०६
२.शासन परिपत्रक क्र.४३०/०५/५ दि.२०.१.२००६

उपरोक्त संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अंतर्गत कार्यवाहीची माहिती राज्य माहिती आयोगास पाठविणे आवश्यक असल्याने सदर अधिनियम अस्तित्वात आल्यापासून म्हणजेच दि.१२.१०.२००५ पासून कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज अपील याबाबतची आपल्या विभागाची माहिती म्हणजेच आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांची एकत्रित माहिती सोबत जोडण्यास्तव विहित पत्रात परिवहन आयुक्त कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता पाठविण्यात यावी. जेणेकरुन विभागाची संकलित माहिती शासनास विहित कालावधीत पाठविणे शक्य होईल.

दि.१२ ऑक्टोबर २००५ पासूनची फेब्रुवारी २००६ अखेर पर्यंतची प्रत्येक महिन्याची माहिती शासनास त्वरीत पाठविणे आवश्यक असल्याने कृपया सदर माहिती दि.२१ मार्च पर्यंत या कार्यालयास व्यक्तीश पाठविण्यात यावी.

आपल्या विभागातील अधिनस्त कार्यालयासहितची माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचे नाव,पत्ता व दूरध्वनी क्रमांकसहित यादी त्यात काही बदल असल्यास आवश्यक सुधारणा करुन पाठवावी.

उपरोक्त कामास प्राधान्य द्यावे ही विनंती.

**स्वाक्षरी/-**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई**

सोंबत- ५ पानी प्रपत्र

**प्रत-**
सर्व उप प्रापअ कार्यालयीन त्यांची माहिती संबंधित प्रापअ यांजकडे विनाविलंब पाठवावी.

D:\mgm\sub

**महाराष्ट्र माहितीचा अधिार अधिनियम २००५**

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३ रा व४ था मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

परिपत्रक क्र.संकीर्ण् २००५/पआ/जसंअ/ममाअ/जा.क्र.३९३३ दि. २२ मार्च २००६
वाचा : १. माहिती अधिकार अधिनियम २००५
२.प.आ.कार्यालयाचा आदेश क्र.२८४/संकीर्ण ४६०५/का.८(१)/केंमाअ/०५/जा.क्र.१२७३६
दिनांक - ११.१०.२००५

**परिपत्रक**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार क्र.३ मधील संदर्भिय कार्यालयीन ओदशान्वये परिवहन आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी, तसेच सहाय्यक माहिती अधिकारी तसेच अपीलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणा-या अर्जावरील कार्यवाहीबाबत प्रस्तुत परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे तपशीलवार सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

कार्यालयात प्राप्त अर्जाची नोंद जनसंपर्क अधिकारी कक्षामध्ये एकाच रजिस्टरमध्ये घेण्यात यावी. जेणेकरुन प्राप्त अर्ज/प्रलंबित प्रकरणे/पहिले अपिल/माहिती आयुक्तांकडील दुसरे अपिल व त्याबाबतच्या नोंदी जिल्हाधिकारी/शासनास पाठविणे शक्य होईल.

परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासनांनी संबंधित माहिती अधिका-यांच्या आदेशाने व स्वाक्षरीने अर्जदारास विहीत मुदतीत व विहित पध्दतीने उत्तरादाखल माहितीची कार्यवाही पूर्ण करुन शुल्क स्विकारुन परस्पर माहिती पाठवावी. त्याची एक प्रत जनसंपर्क कक्षास नोंद घेण्याकरिता दयावी व नस्ती जतन करावी.

अर्जात मागविलेली माहिती एकापेक्षा जास्त विषयांची असल्यास व सदर माहिती दोन अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्यास सर्व माहिती अधिकारी उप आयुक्त दर्जाचे असल्यास याबाबत अंतिम निर्णयार्थ प्रकरण सह परिवहन आयुक्त यांचेकडे सादर करावे. सदर प्रकरणी सह परिवहन आयुक्त यांनी दिलेला निर्णय बंधनकारक राहील.

प्राप्त अर्जामध्ये मागविण्यात आलेल्या माहितीचे विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्यास असे सहाय्यक माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरच परत पाठवावेत.

प्राप्त अर्जासंबंधी अपील असल्यास/दुस-या अपीलाबाबत माहिती आयुक्तांचा पत्रव्यवहार/सुनावणी आदेश तयार करावयाची कार्यवाही संबंधित कार्यासनाने संबंधित माहिती अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली करावी.

उपरोक्त आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

**स्वाक्षरी/-**
**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई**

अपर परिवहन आयुक्त/सह परिवहन आयुक्त यांना अग्रेषित
परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व नियंत्रक अधिकारी
परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी

D:\mgm\sub

# महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३ रा व४ था मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

**परिपत्रक क्र.पआ /जसंअ/मा.अ./जा.क्र.१२२६५ दि.१९ जुन २००७**

वाचा : १. माहिती अधिकार अधिनियम २००५ २) महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५

**परिपत्रक**

माहितीचा अधिकार संदर्भात काही प्रश्न समोर आली असून त्याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th colspan="2">स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>१</td><td>माहिती मिळविण्याकरिताचा अर्ज महाराष्ट्रात फक्त मराठी भाषेतच असावा</td><td colspan="2">महाराष्ट्र शासनाचा कारभार मराठीत असावा असे असले तरीसुध्दा माहिती अधिकार अधिनियम कलम ६(१) अनुसार माहिती अर्जाचा तपशील इंग्रजी,हिंदी किंवा क्षेत्राच्या राज्यभाषेतील लेखी स्वरुपात असावा अशी तरतूद असल्याने मोटार वाहन विभागाच्या कार्यालयानी माहितीचा अर्ज इंगजी,हिंदी अथवा मराठी या पैकी कोणत्याही भाषेतील असल्यास स्विकारावा.</td></tr>
<tr><td>२</td><td rowspan="4">माहिती घेताना आकारावयाचे शुल्क</td><td colspan="2">माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती देताना सर्रास रुपये २/- शुल्क आकारले जाते तथापि माहिती मिळण्याचे शुल्यकाबाबत महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम ४(अ) (क) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद केलेली आहे.</td></tr>
<tr><td rowspan="3"></td><td>४(अ)(क) जेव्हा संबंधित विभागाने काही दस्तऐवज, नकाशे इ.किंमत आधीच निश्चित केलेले असेल तेव्हा</td><td>अशा प्रकारे निश्चित केलेले किंमत अधिक टपाल खर्च</td></tr>
<tr><td>(ख) जेव्हा माहिती एकतर छायाप्रतीच्या स्वरुपात किंवा अन्य स्वरुपात (प्रतीत) चटकन मिळण्याजोगी असेल तेव्हा</td><td>(एक) तयार केलेल्या किंवा नक्कल केलेल्या प्रत्येक पृष्टासाठी (ए-४ किंवा ए-३ आकाराच्या कागदामधील) दोन रुपये अधिक टपाल खर्च किंवा (दोन) मोठया आकाराच्या कागदामधील एका प्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा खर्चाची किंमत अधिक टपाल खर्च</td></tr>
<tr><td>(ब अभिलेखाचे निरिक्षण करण्यासाठी</td><td>पहिल्या एका तासाकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटासाठी (किंवा त्यांच्या भागासाठी ) पाच रुपये इतके शुल्क</td></tr>
</table>

उपरोक्त आदेशाचे तंतोतंत पालन करयण्यात यावे.

स्वाक्षरी/-
परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत - १.सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
२.परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी (नियंत्रक अधिकारी)
३. परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी

D:\mgm\sub

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५**

परिवहन आयुक्त कार्यालय
वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१

परिपत्रक क्र,प.आ./जसंअ/जा.क्र. ११४४७
वाचा - माहिती अधिकार अधिनियम २००५

14 AUG 2007

# परिपत्रक

परिवहन आयुक्त कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अंतर्गत अर्जाच्या फॅक्स या बाबत निर्माण झालेल्या अडचणीमुळे खालील सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) माहिती अधिकार अधिनियम ६(१) अंतर्गत मुळस्वरुपात विहित शुल्क/स्टॅम्प (रु १०/-) लावलेला अर्ज विचारात घेणे अपेक्षित आहे.

२) माहिती द्यावयाची मुदत असा वैध अर्ज मुळ स्वरुपात प्राप्त झाल्यानंतरच सुरु होते

३) फॅक्सद्वारे प्राप्त झालेल्या अर्जासंबंधाने तयारी करुन उत्तर तयार ठेवण्यास हरकत नाही.तथापी असे उत्तर वैध स्वरुपातील मुळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसात देण्यात यावे.

उपरोक्त सुचनांचे त्वरित पालन करण्यात यावे.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य,मुंबई

**प्रत -**

१) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
२) अपर परिवहन आयुक्त / सह परिवहन आयुक्त यांना अग्रेशित
३) परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी,नियंत्रण अधिकारी.
४)परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य,मुंबई

*

माहितीचा अधिकार अधिनियम २००५

परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ३रा/४ था मजला,
शासकीय वसाहत, बांद्रे (पूर्व) मुंबई ५१

परिपत्रक क्र.पआ/जसंअ/मा.अ./२००८/जा.क्र. ८७९० - दिनांक : 23 JUL 2008

## परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कार्यवाही संदर्भात अपीलाची सुनावणी निश्चित केल्याचे अपीलकारास कळवितांना त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. जेणेकरुन अपील सुनावणीचेवेळी माहिती अधिकारी हजर राहू शकतील. तथापि याबाबत असे निदर्शनास येते की, संबंधित कार्यासनामधून अपीलकारास सुनावणी निश्चितीचे पत्र पाठवितांना त्याची प्रत माहिती अधिका-यांना दिली जात नाही. सबब माहिती अधिकारी सुनावणीस हजर राहू शकत नाहीत. अपीलकार हे मुंबई बाहेरुन आलेले असल्याने त्यांना माहिती अधिकारी उपस्थित नसल्याने परत परत बोलावणे योग्य नसून माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित नसणे हे अपील सुनावणीच्या प्रचलीत कार्यपध्दतीस अनुसरुनसुध्दा अयोग्यच आहे.

त्याचप्रमाणे बरेचदा कार्यासनातून अर्जदारास माहिती देताना त्याची प्रत सहाय्यक माहिती अधिकारी यांना न दिल्यामुळे शासनाला अहवाल पाठवितांना सदर प्रकरणी कार्यवाही होऊनही प्रकरण प्रलंबित दाखविले जाते.

सबब, उपरोक्त बाब टाळण्याकरिता

१.संबंधित कार्यासन अधिका-यांनी अपीलकारास सुनावणी निश्चितीचे पत्र पाठवितांना त्याची प्रत संबंधित माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांना देणे आवश्यक आहे.

२.तसेच अर्जदारास माहिती देतांना अथवा शुल्क निश्चितीबाबत कळवितांना त्याची प्रत सहाय्यक माहिती अधिकारी यांना देणे आवश्यक आहे.

सर्व जन माहिती अधिकारी आणि कार्यासन अधिका-यांनी याबाबत नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी असे याद्वारे सुचित करण्यात येत आहे.

23/7/08
सह परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

23/7/08

प्रत :

१.परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी, नियंत्रक अधिकारी
२.परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी

परिवहन आयुक्त कार्यालय
जा. ८७९०
9436
पाठविले : 23 JUL 2008